# गेवराईतील खाजगी बँकांची विश्वासार्हता बुडित
# माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब लक्ष्य घाला

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरात खाजगी बँका, नागरी व मल्टीस्टेट, महिला पतसंस्था व ग्रामीण पतसंस्थांना यांनी आर्थिक क्षेत्रात मोठी क्रांती घडवून आणली असे म्हटले जाते. ग्रामीण भागापर्यंत अर्थपुरवठा आणि आर्थिक सोयी उपलब्ध करून दिली आहे परंतु यापेक्षाही अधिक खाजगी बँकेच्या संदर्भात निश्चितपणे विश्वास जोपासत असताना काहींनी आत्ताच उघडलेल्या पतसंस्था महिला अर्बन यांच्या गैर कारभारामुळे लोकांची विश्वासार्हता बुडीत होत चालली आहे.

खाजगी बँकांची विश्वासर्हता गमावण्यास कारणीभूत कोण? या खासगी बँकांच्या माध्यमातून पैशाची देवाणघेवाण करून गैरवापर केला जातो, हा संशय निमर्ाण होण्यासारखे वातावरण निर्माण का झाले? तर काहींनी आत्ताच टाकलेल्या पतसंस्था चालकांनी ठेवीदारांचे पैसे उद्योगधंद्यांसाठी वापरले कुणी कारखानदारी, तर कोणी जिनिंग ची दुकानदारी चालू करत पुन्हा बंद करण्याचीही वेळ त्यांच्यावर आली आहे दुसरीकडे छोट्या मोठ्या व्यवसायकांकडून पिग्मी प्रतिनिधी यांच्याकडे पैसे जमा केले आहेत तेही परत देण्यास काही बँकांकडून स्पष्ट नकार दिला जातोय पिग्मी प्रतिनिधी यांनी बँकेकडे जमा केलेली रक्कम आज रोजी बँकेत नसावी का हे अतिशय दुर्दैव आहे म्हणून छोट्या व्यवसायांकडून जमा केलेले पैसे पिमी प्रतिनिधी यांच्या अंतर्गत परत दिले जातात मात्र आज देऊ उद्या देऊ असे वायदे करून दिशाभूल मोठ्या प्रमाणात केली जाते त्यामुळे गेवराईतील खाजगी बँकांची विश्वासार्हता बुडित होते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब तुम्हीच या बाबत लक्ष्य घालावे आणि ही परिस्थिती सुधारण्यासाठी सर्व बँकांची बैठक बोलावली आणि ज्या बँक संस्था चालकांनी पिग्मी प्रतिनिधी यांची पिळवणूक केली आहे त्यांना धारेवर धरावें आणि सामान्य घरातील पिग्मी प्रतिनिधीला न्याय मिळवून द्यावा अशी मागणी होत आहे.

## संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त ह भ प मोहन महाराजांचे किर्तन



**बीड । प्रतिनिधी**

श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे गेल्या १३वर्षापासुन दरवर्षी वैराग्यमुर्ती संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी दिन विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते याही वर्षी दि.२२/१/२०२५बुधवार रोजी सकाळी संत वामनभाऊ यांच्या मुर्ती अभिषेक,आरती व रात्री ८.३०ते११यावेळेत संत वामनभाऊ यांच्या जिवन चरीत्रावर जेष्ठ किर्तनकार ह भ प मोहन महाराज खरमाटे यांचे सुश्राव्य किर्तनाचे व प्रसाद वाटपाचे आयोजन करण्यात आले आहे तरी या किर्तनाचा लाभ बीड शहारातील व परीसरातील सर्व भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीडचे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप यांनी केली.

## श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर यशवंत नगर येथे गायत्री महायज्ञ व(गणपती अथर्वशीर्ष) सहस्त्र आवर्तन अभिषेक संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

गायत्री तिर्थ शांतिकुंज हरिद्वार च्या आशीर्वादाने हिंदूधर्म व सनातन संस्कृतीच्या परंपरेनुसार व्यक्तीमध्ये सद्बुद्धी व सत्प्रेरणा जागविण्यासाठी गायत्री परिवारातर्फे जागोजागी सामुदायिक यज्ञाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. या कार्याचे प्रणेते तपोनिष्ठ वेदमूर्ती पंडित श्रीराम शर्मा आचार्य यांच्या प्रेरणेने दिनांक- १७/०१/२०२५ शुक्रवार पौष वद्य संकट चतुर्थी निमित्त गायत्री महायज्ञ व (गणपती अथर्वशीर्ष) सहस्त्र आवर्तन




अभिषेक आयोजित करण्यात आला . या यज्ञाचे यजमान-सौ.व श्री तुकाराम पंत जोशी सपरिवार हे होते. आजच्या या गायत्री यज्ञाचे पुरोहित म्हणून गायत्री परिवाराचे बीड जिल्हा समन्वयक ह.भ.प. मोहन महाराज खरमाटे होते, या कार्यक्रमात होम हवन तसेच एक गर्भसंस्कार हा कार्यक्रम देखील करण्यात आला, यावेळी यशवंत नगर मधील असंख्य माता भगिनी व भावीक भक्त उपस्थित होते,

## राज्य दिन व क्रीडा सप्ताह जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड व रत्नभुमी विद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यामाने उत्साहात उद्घाटन संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

राज्य शासनाद्वारे १५ जानेवारी हा दिवस ऑलिंपीकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन म्हणुन साजरा करण्यात येत आहे.

दिवंगत खाशाबा जाधव, गोळेश्वर, कराड जिल्हा सातारा यांनी ऑलंपीक क्रीडा स्पर्धा, हेलसिंकी १९५२ मध्ये पहिले वैयक्तिक क्रीडा प्रकारातील कुस्ती क्रीडा प्रकारात पहिले पदक (कास्य) पटकावून देशाच्या क्रीडा क्षेत्रात ऐतिहासिक कामगिरी केलेली आहे. त्यांची आंतरराष्ट्रीय



स्तरावरील कामगिरी राज्याचा बहुमान व नवोदित खेळाडूंना दर्जेदार कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन मिळावे यासाठी दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन दि. १५ जानेवारी हा राज्य क्रीडा दिन म्हणुन साजरा करण्यात येतो. महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृती जोपासना व जनतेमध्ये क्रीडा वातावरण निर्माण होण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक जिल्हयात दर वर्षी क्रीडा सप्ताह साजरा करण्यात येतो. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद बीड यांचे विद्यमानाने रत्नभुमी विद्यालय उमा किरण कॉम्प्लेक्स, शाहुनगर बीड येथे दि. १५ जानेवारी २०२५ ऑलंपीक वीर दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडा दिन व दि. १५ जानेवारी ते २१ जानेवारी हा क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन शिव छत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी जेष्ठ क्रीडा संघटक प्रा.जे. पी.शेळके यांच्या हस्ते खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पुजन व पुष्पहार अर्पन करुन दिप प्रज्वलन करुन क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन करण्यात आले.

## सौ.के.एस. के. (काकू) कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची कृषिक २०२५ प्रदर्शनास भेट

### प्रात्याक्षिकाभिमुख कृषि प्रदर्शन भेटीतून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास : डॉ. जी.व्ही. साळुंके

**बीड । प्रतिनिधी**

सौ.के.एस.के. (काकू) कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी कृषि विज्ञान केंद्र बारामती येथे आयोजीत कृषिक २०२५ या भारतातील सर्वात मोठया प्रात्यक्षिकाभिमुख कृषि प्रदर्शनाला दि.१६ जानेवारी रोजी भेट दिली.

श्री अनंत कृषि विकास प्रतिष्ठाण संस्थेचे सहसचिव डॉ. जी.व्ही. साळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी नेहमीच प्रात्यक्षिकावर भर दिला जातो तसेच महाराष्ट्रात आणि




परराज्यातही शैक्षणिक भेटींचे आयोजन केले जाते. दि. १६ ते २० जानेवारी दरम्यान होत असलेल्या कृषिक- २०२५ ला देखील भेट देण्यात आली. या शैक्षणिक भेटीमध्ये महाविद्यालयातील एकूण ९५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

कृषिक-२०२५ मध्ये विद्यार्थ्यांनी फळ पिकांच्या विविध जाती, भाजीपाल्यांचे विविध वाण, विकसित तंत्रज्ञान, कृत्रिम बुध्दीमत्तेवर आधारीत यंत्र, सेन्सर, ड्रोन तंत्रज्ञान, यंत्राद्वारे कलम करण्याच्या पध्दती, हायड्रोपोनिक्स, व्हर्टिकल फार्मिंग, पूर्व अनुमानित शेती तंत्र, ऊसाच्या विविध जाती व तंत्रज्ञान, पाणी देण्याच्या विविध पध्दती, कमी पाण्यावरील शेती, नामांकित कंपन्यांचे भाजीपाला पिकांचे विविध वाणांचे प्लॉट्स, ऑर्किड लागवड, दूध काढण्याच्या मशिनरी, ट्रॅक्टरचलित विविध अवजारे, यंत्र, ऊसतोडणी यंत्र, फवारणी ब्लोअर, तसेच विविध शेती उपयोगी यंत्रसामग्री, गांडूळखत निर्मिती तंत्र, पशु प्रदर्शन यामध्ये विविध प्रजातीचे वळू, गाई, शेळया, कोंबडया ई., आदि गोष्टींची सखोल माहिती घेतली.


## जाहीर प्रगटन

ॲड. रोटे डी.एम.

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २३३/२०२४**

**रघुनाथ भगवानराव भोसले विरुध्द न.प.बीड**

पहा- १. **रघुनाथ भगवानराव भोसले**, रा. शिक्षक कॉलनी, शाहुनगर, बीड ता. जि. बीड- उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत भगवान किसन भोसले** यांचा दिनांक २२/०३/२०२० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास न.प. बीड ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे न.प. बीड ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १८/१२/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख २०/०१/२०२५ ही आहे.

शिक्का (स्वाक्षरीत)
तहसिलदार, बीड

## जाहीर प्रगटन

ॲड. रोटे डी.एम.

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २३६/२०२४**

**अमोल विठ्ठल तांदळे विरुध्द ग्रा.पं. हिंगणी (खुर्द)**

पहा, १. **अमोल विठ्ठल तांदळे**, रा. माळेगाव ता. सिन्नर जि.नाशिक

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत बापुराव बाबुराव तांदळे** यांचा दिनांक २४/१०/१९९३ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास हिंगणी (खुर्द) ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे हिंगणी (खु.) ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/१२/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख २० /०१ /२०२५ही आहे.

शिक्का (स्वाक्षरीत)
तहसिलदार, बीड

## जाहीर प्रगटन

ॲड. रोटे डी.एम.

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ३१७/२०२४**

**गोरे ईश्वर लक्ष्मनराव विरुध्द ग्रा.पं. उमरद(ज)**

पहा- १. **गोरे ईश्वर लक्ष्मनराव**, रा.जिजाऊ नगर, जुना धानोरा रोड, बीड ता.जि. बीड उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत सुर्यभान एकनाथ गोरे** यांचा दिनांक १५/०९/१९६५ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास उमरद (ज.) ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे उमरद (ज.) ता.जि.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९/०१/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख २०/०२/२०२५ ही आहे.

शिक्का (स्वाक्षरीत)
तहसिलदार, बीड

## जाहीर प्रगटन

ॲड. रोटे डी.एम.

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ३२१/२०२४**

**राजु कवरलाल परदेशी विरुध्द न.प. बीड**

पहा- १. **राजु कुवरलाल परदेशी**, रा. मोची गल्ली, बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत कुसूम कवरलाल परदेशी** यांचा दिनांक ०७/०४/२०२३ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास बीड न प बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे न प बीड ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९/०१/२००२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख २०/०२/२०२५ ही आहे.

शिक्का (स्वाक्षरीत)
तहसिलदार, बीड

## जाहीर प्रगटन

ॲड. रोटे डी.एम.

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.२३४/२०२४**

**माणिक बळीराम तिपाले विरुध्द ग्रा.पं, नांदुर हवेली**

पहा- १. **माणिक बळीराम तिपाले** , रा. पारगाव जाती, ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत माणिक ज्ञानोबा तिपाले** यांचा दिनांक दिनांक १५/०३/१९७१ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास नांदुर हवेली ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे नांदुर हवेली ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९/०१/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख २०/०२/२०२५ ही आहे.

शिक्का (स्वाक्षरीत)
तहसिलदार, बीड

## जाहीर प्रगटन

ॲड. रोटे डी.एम.

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २३५/२०२४**

**अमोल रामदास तिपाले विरुध्द ग्रा.पं. नांदुर हवेली**

पहा- १. **अमोल रामदास तिपाले**, रा. पारगाव जती ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत ज्ञानोबा राजू तिपाले** यांचा दिनांक १५/०६/१९३० रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास नांदुर हवेली ता.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे नांदूर हवेली ता.जि.बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/०१/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
सदर प्रकरणात पुढील तारीख २०/०२/२०२५ ही आहे.

शिक्का (स्वाक्षरीत)
तहसिलदार, बीड

## जाहीर प्रगटन

### मा. श्री. अक्षय सं. जगताप दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज नं.२६०/२०२४**

**ॲड. कोठुळे एच. एस. यांच्या मार्फत**

**राहिबाई मारुती ढेरे विरुध्द निरंक**

अर्जदार : १. राहिबाई भ्र. मारुती ढेरे, वय ५० वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. नारायणवाडी तहत निमगाव (मा.), ता.शिरुर कासार, जि. बीड. मो. ९३०७२२८६५७

**अर्ज: बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत.**

ज्यापोक्षा **देवदत्त पि. मारुती ढेरे हे मौजे नारायणवाडी, ता. शिरुर कासार जि.बीड येथे दिनांक २९/०१/२०२४ रोजी मयत झालेले आहेत.** अर्जदार ही मयताची आई आहे. तसेच मयताचे वडील हे हायात असुन ते मयताचे कायदेशीर वारस ठरत नसलयाने त्यांना प्रस्तुत अर्जात सामाविष्ट केले नाही. तसेच मयत हे अविवाहीत असतानाच मयत झालेले आहेत. म्हणून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस आहेत हे की, त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक २१/१०/२०२४ रोजी माइया सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०५/१२/२०२४ ही आहे.

आदेशावरून.
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिरूर का.

## जाहीर प्रगटन

### मा. श्री. अक्षय सं. जगताप, दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. २७५/२०२४**

**ॲड. कोठुळे एच. एस. यांच्या मार्फत**

**दत्ता निवृत्ती घायाळ वि. निरंक**

अर्जदार :१. दत्ता पि. निवृत्ती घायाळ, वय ६६ वर्षे. धंदा निल रा. मु.सवसवाडी तहत जाटनांदूर, ता. शिरुर कासार, जि. बीड मो. ७२६३०४९९३७, २. आजिनाथ पि. निवृत्ती घायाळ, वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा. सदर, ३. ज्ञानेश्वर पि. निवृत्ती घायाळ, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. सदर. विरुद्ध

गै. अर्जदार : निरंक

अर्जः बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत..

ज्यापोक्षा सुलोचना भ्र. निवृत्ती घायाळ हे मौजे सवसवाडी तहत जाटनांदूर ता. शिरुर कासार, जि.बीड येथे दिनांक ११/०३/२०२४ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार क १ त ३ हे को, मयताचे मुले आहेत. तसेच मयताचे आई वडील व पती हे यापुर्वीच मयत झालेले आहेत अर्जदार क. १ते३ हे मयताचे कायदेशीर वारस आहेत. हे की, त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शालीत दिसल्यास त्यांना सदर उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १४/११/२०२४ रोजी माइया सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ०३/०१/२०२५ ही आहे.

आदेशावरून.
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिरूर का.

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

### गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. ए.डी. कुलकर्णी यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज कमांक ०५/२०२५**

**अन्वर पि. महंमद पठाण विरुद्ध निरंक**

**(मार्फत ॲड. मेघारे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **१) महंमद अब्बास पठाण** हे / या दिनांक २०/०६/२००० रोजी मयत झाले/झाल्या आहेत. व **२) बेबी महंमद पठाण** हे / या दिनांक ०१/०७/२०२४ रोजी मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार **१ अन्वर महंमद पठाण, वय - ५४ वर्षे, रा. खळेगांव, ता. गेवराई, ता. गेवराई, जि.बीड, व २. जलाल महंमद पठाण, वय - ४० वर्षे, रा. खळेगांव, ता. गेवराई, ता. गेवराई, जि.बीड** यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत **१) महंमद अब्बास पठाण व २) बेबी महंमद पठाण** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक १५/०१/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १४/०२/२०२५

आदेशावरून.
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई

## जाहीर प्रगटन

ॲड. रोटे डी.एम.,

### मा.श्रीमती एस. एस. पिंगळे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १२९५ / २०२४**

**मोहन भिवा बांगर व इतर वि. निरंक**

अर्जदार-१. मोहन पि. भिवा बांगर, वय- ४९ वर्षे, धंदा -शेती, रा. खंडाळा ता. जि. बीड, २.ओमकार पि. मोहन बांगर, वय - १४वर्षे, धंदा - शिक्षण, अज्ञान अ.पा.क. वडील अर्जदार क. १ रा. सदर

**प्रकरण :- भारतीय वारसा हक्क कायदा १८७२ कलम ३७२ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत शोभा भ्र. मोहन बांगर, रा. खंडाळा ता.जि.बीड, यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मयत शोभा भ्र. मोहन बांगर, या दिनांक १९/०१/२०२४ रोजी खंडाळा ता. जि. बीड, येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार क ०१ हे मयताचे पती आहेत. तसेच अर्जदार क. २ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार क. २ हा अज्ञान असून त्याचे अ.पा.क. वडी अर्जदार का १ हे आहेत. अर्जदारा शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत. मयताचे नांवे खालील प्रमाणे जमा असलेली रक्कम उचलण्याकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

तपशील- महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा-लिंबागणेश) ता.जि.बीड, खाते नं. ८००१७८३९१०१, रक्कम रुपये ३०,०५३.८०/-, २. मुदत ठेव पावती क्र. ०६२८७९ , ३,१८,९४५/-, ३.मुदत ठेव पावती क्र. ०६६८४५, १,०३,८९२/-, ३. मुदत ठेव पावती क्र. ३७०१९९, २,८६,५४२/- एकूण रक्कम ७३९४३२.८०/-

मयत शोभा भ्र. मोहन बांगर यांचे नावे असलेल्या वर नमूद केलेली रक्कम अर्जदारांच्या नावे देण्यांत याव्यात असे अर्जदारांने म्हटले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदार यांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे कायदेशीर वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. पु.ता. १५/०२/२५

आज दिनांक ०६/१२/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

आदेशावरून.
(स्वाक्षरीत) शिक्का (स्वाक्षरीत)
क.लिपीक सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

# निता अंधारे व बीड न.प. प्रशासन जाणीवपूर्वक 100% हलगर्जी व निष्क्रिय

## बीड शहर बचाव मंचाची शहरात सर्वत्र पाहणी व लोकसंवाद सुरू

**बीड । प्रतिनिधी**

बीड न.प.ची यंत्रणा पूर्णतः कोलमडली बीड शहराची सर्वत्र अतिशय दयनीय स्थिती बीड शहरातील नागरिकांमध्ये प्रचंड संताप निता अंधारे यांनी केले बीड हे कचऱ्याच्या उकाड्यांचे शहर बीड शहर बचाव मंचाच्या समन्वय समितीचे अनेक सदस्य गेल्या काही दिवसांपासुन बीड शहरांमध्ये सर्वत्र ठिकठिकाणी जाऊन पाहणी व दौरा करत आहेत व लोकांशी संवाद करत आहेत. शहरांमध्ये गल्लोगल्ली सर्वत्र, जिकडे पहावे तिकडे नजर जाईल तिथे घाणीचे प्रचंड साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात दुर्गंधीचा व रोगराईचा व साथीच्या



रोगांचा सामना करावा लागत आहे. कचरा गोळा करणाऱ्या घंटागाड्या बंद झाल्या आहेत. विधानसभेच्या निवडणुकीनंतर कचरा उचलणाऱ्या गाड्या व ट्रॅक्टर बंद केले आहेत. त्यातच मोकाट जनावरे व कुत्रे यांचा प्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. चौका-चौकात, गल्लोगल्ली जिकडे पहावे तिकडे मोकाट कुत्र्यांचे व गुराढोरांचे कळपच्या कळप शहराच्या रस्त्यांवर सैर-वैर फिरत असतांना दिसत आहेत. वाहतुकीला व नागरी रहदारीला यामुळे प्रचंड मोठ्या प्रमाणामध्ये अडथळा निर्माण होतो आहे व त्रास सहन करावा लागत आहे. ठिकठिकाणी अपघात होऊन नागरिक गंभीररित्या जखमी होत आहेत. बऱ्याच नागरिकांना मोकाट जनावरांमुळे झालेल्या अपघाताने अपंगत्व येत आहे. ही वस्तुस्थिती आहे. विकासाच्या चाललेल्या या पर्वाने शहर अगदी हैरान व परेशान आहे. अशा प्रकारचे नगरपालिकेचे प्रशासन व कामकाज तुलनात्मक दृष्ट्या जगात कोठेही नाही. नगरपालिकेची यंत्रणा, प्रशासन व याला चालवणाऱ्या निताअंधारे या नागरिकांचा जाणीवपूर्वक सूड घेत आहेत. अंधारे ताईंनी त्यांच्या नावाला शोभेल असा शहराच्या सर्व विस्तारीत भागांमध्ये अंधार केला आहे. स्ट्रीट लाईट्स बंद स्थितीत आहेत. महिला ज्येष्ठ नागरिक लहान मुले यांना अंधारामुळे प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. बीड शहरांमधील पाणीपुरवठा यंत्रणा पूर्णतः विस्कळीत झालेली आहे. गेल्या एक महिन्यापासून अनेक भागांमध्ये नागरिकांना एक थेंब भर ही पिण्याचे पाणी मिळालेले नाही. तळ्यात मळ्यात सगळीकडे पाणी असूनही नीताताई अंधारे यांच्या वतीने नागरिकांसाठी कृत्रिम पाणी टंचाई निर्माण करण्यात येत आहे. 'नीता ताईंचं' करावं तेवढं कौतुक कमीच आहे. खरंचच या आपल्या बीड शहरामध्ये नागरिकांसमोर अडचणी निर्माण करण्यामध्ये त्यांनी केलेले योगदान अविस्मरणीय आहे व ते कधीही विसरता येणार नाही. विधानसभा निवडणुकीच्या आधी बीड शहर बचाव मंचाने बीड शहरातील नागरिकांना मूलभूत सोयी सुविधांच्या विषयी जो त्रास सहन करावा लागत आहे,नगरपालिकेच्या गलथान कारभारामुळे प्रचंड संताप पसरलेला आहे, या सर्व बाबींवर सर्व स्तरातून अभ्यासपूर्ण जागृती करून सर्व नागरी समस्यांना वाचा फोडण्याचे काम केले होते. सी.ओ निताताई अंधारे यांच्या तात्काळ बदलीची मागणी केली होती. ती अद्यापही झालेली नाही.

## दर रविवारी कृषी दुकाने बंद

### वडवणी तालुका कृषी असोसिएशनचा निर्णय

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील सर्व कृषी साहित्य विक्रेत्यांनी आज पासून प्रत्येक आठवड्यातून एक दिवस १५ जानेवारी ते १५ मे पर्यंत प्रत्येक रविवारी दुकान बंद ठेवण्याचा निर्णय वडवणी तालुका कृषी असोसिएशन ने घेतला आहे. वडवणी तालुक्यातील कृषी व्यापारी बांधवांच्या उपस्थितीत





नुकत्याच झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

वडवणी तालुक्यातील लहान-मोठे एकही कृषी दुकान रविवारी सुरू राहणार नाही, असा ठराव या बैठकीत करण्यात आला. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे आपण आपल्याला आगोदर एक जिवंत माणूस आहोत हे लक्षात घेतले पाहिजे. तरच आपल्याला आरोग्य धनसंपदा कळली आहे असे म्हणता येईल. माणसाच्या जीवनात पैसा हाच सर्वस्व नसतो त्या पलीकडे हि काही माणसाचं वैयक्तिक जिवन असतं खरं पाहिलं तर व्यापाऱ्यासारखा सतत कामातच गुंतणार दुसरा वर्ग नाही, मग तो व्यापारी कशाचा का असेना. शेतकऱ्यांना तरी वापसा मोडला म्हणून का होईना सुट्टी मिळते पण व्यापाऱ्याचा मात्र कधीच वापसा मोडत नाही. नोकरदारांना पण आठवड्याला सुट्टी मिळते.ते लोकं सुट्टी दिवशी स्वत:ला वेळ देतात,कुटुंबाला वेळ देतात.काही आवडी-निवडी चे कामं करतात या धावपळीच्या जिवनातून एक दिवस का होईना पण ते रिलॅक्स होतात.

त्यामुळे एक दिवस सुट्टीचा निर्णय सर्व कृषी व्यापाऱ्यांनी घेतला आहे. वडवणी तालुक्यातील सर्व ग्रामीण मधील व शहरांमधील दुकानदारांनी आप-आपली कृषी दुकान प्रत्येक रविवारी बंद ठेऊन वडवणी तालुका कृषी असोसिएशन ला सहकार्य करावे असे आवाहन वडवणी तालुका कृषी असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे.

## अधिकारी, कर्मचाऱ्यांनी अवघ्या दोन तासात जिल्हा परिषदेची केली स्वच्छता

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा परिषदेच्या प्रांगणाची आवघ्या दोन तासात स्वच्छता करण्यात आली. मुख्यमंत्री महोदयांच्या १०० दिवस विकास कामाच्या निमित्ताने बीड जिल्हा परिषदेत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. शनिवार दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ७.०० ते ९.०० या अवघ्या दोन तासात जिल्हा परिषदेच्या अधिकारी आणि कर्मचारी यांनी संपूर्ण जिल्हा परिषदेचा परिसर स्वच्छ झाला. यावेळी जिल्हा परिषदेच्या आवारातील छोटी झुडपे, कचरा आदींची सापसफाई करण्यात आली. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांच्या उपस्थिती स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे, लेखा वित्त अधिकारी सुरेश केंद्रे, कार्यकारी अभियंता पवार, जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्रीमती मेश्राम, आदीसह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होती. जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन आणि साम ान्य प्रशासन विभागाच्या वतीने स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते.



### सात विभाग प्रमुखांची अनुपस्थिती

**शिक्षणाधिकारी (फुलारी) भगवान फुलारी, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) नागनाथ शिंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) डॉ.ज्ञानोबा म ोकाटे, शिक्षणाधिकारी (निरंतर) संजय पंचगल्ले, आदींची उपस्थित राहिले नाहीत. अनुपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यावर कारवाई होणार आहे.**

## पत्रकार अरविंद ओव्हाळ यांना मुकनायक पुरस्कार जाहीर

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथील धडाडीचे युवा पत्रकार अरविंद ओव्हाळ यांना माजलगाव येथील निर्भिड पत्रकार संघाचा यंदाचा मानाचा व प्रतिष्ठेचा मुकनायक पुरस्कार जाहीर करण्यात आला.याबद्दल ओव्हाळ यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

गेल्या दोन अडीच दशकांपासुन माजलगाव तालुक्यातील पत्रकारितेत सक्रिय असलेले व सध्या दै.वास्तवचे उपसंपादक म्हणून काम करत असलेले धडाडीचे युवा पत्रकार अरविंद ओव्हाळ यांनी पत्रकार म्हणुन काम करत असताना तालुक्यातील विविध सामाजिक व जनहिताचे प्रश्न सोडवण्यासाठी काय प्रयत्न करत असतात. सडेतोड बातम्यांच्या माध्यमातुन



त्यांनी अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावले आहेत. ते ध्येयनिष्ठ व सडेतोड लिखाण करणारे पत्रकार म्हणुन सर्व परिचित आहेत. ओव्हाळ यांचे कार्य समाजहिताचे असल्याने त्यांच्या कार्याची माजलगाव येथील निर्भिड पत्रकार संघाने दखल घेत या पत्रकार संघाच्या वतीने प्रतिवर्षी देण्यात येणाऱ्या मुकनायक पुरस्कारासाठी यंदा अरविंद ओव्हाळ यांची निवड केली.

## लोक आंदोलन न्यासाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी तुषार पाटील यांची निवड

### ॲड अजित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात संघटन मजबूत करणार: तुषार पाटील

**बीड । प्रतिनिधी**

ज्येष्ठ समाजसेवक श्री. अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली राळेगणसिद्धी येथे झालेल्या बैठकीमध्ये लोक आंदोलन न्यासाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते श्री. तुषार पाटील यांची निवड करण्यात आली. मागील १० ते १२ वर्षांपासून श्री. तुषार पाटील हे भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनात सक्रियपणे काम करत आहेत.लोक आंदोलन न्यासाच्या दिनांक ५ जानेवारी २०२५ रोजी राळेगण सिद्धी येथे ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आलेल्या बैठकीत महाराष्ट्रातील २५ जिल्ह्यातील जिल्ह्याध्यक्षांची निवड करण्यात





आली. ह्या बैठकीमध्ये अण्णांनी जिल्हाध्यक्षांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले संघटन मजबूत असेल तर सरकारवर दबाव टाकून आपण लोकहिताचे कायदे करून घेऊ शकतो व त्याबरोबरच अन्यायाला वाचा फोडू शकतो असे अण्णांनी कार्यकर्त्यांना उद्देशून सांगितले. संघटनेत काम करताना शुद्ध आचार, शुद्ध विचार, निष्कलंक चारित्र्य, जीवनात त्याग व अपमान सहन करण्याची शक्ती करण्याची शक्ती या पंचसुत्रीं आपण जीवन जगत असताना काटेकोरपणे पाळायला हव्यात असे अण्णांनी यावेळी सांगितले.

## अखेर शालेय विद्यार्थ्यांच्या दुसऱ्या गणवेशाची प्रतिक्षा संपली ; प्रजासत्ताक दिन नविन गणवेशात साजरा होणार

**बीड । प्रतिनिधी**

समग्र शिक्षा अंतर्गत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील इयत्ता १ ली ते ८ वी मधील सर्व मुली, अनुसूचित जाती जमाती प्रवर्गातील मुले तसेच दारिद्र्यरेषेखालील पालकांची मुले यांना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. सन २०२४-२५ मध्ये एक राज्य एक गणवेश योजना राबविण्यात आली. यात अनेक मुलांना स्वातंत्र्य दिन जुन्या गणवेशावर साजरा करावा लागला संबंधित प्रकरणात सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे यांनी गतवर्षी प्रमाणेच गणवेशाचे कामकाज शालेय व्यवस्थापन समिती मार्फत करण्यात यावे जेणेकरून विद्यार्थ्यांना वेळेवर गणवेश मिळेल यासाठी जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी जि प बीड, शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जि प बीड यांना लेखी निवेदनाद्वारे मागणी करत आंदोलनाचा ईशारा दिला होता.त्यानंतर शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी दीड कोटीचा निधी सीईओंच्या मान्यतेने गटशिक्षणाधिकारी यांना पीएफएम एस प्रणाली द्वारे वर्ग करण्यात आला आणि अखेर शालेय विद्यार्थ्यांना दुसरा गणवेश मिळाला आहे.

## नामदार पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात गेवराई तालुक्यात विकास गंगा वाहणार : श्रीकांत सानप

### नागरिकांनी भाजपा सदस्य नोंदणी अभियानात सहभागी व्हावे

**गेवराई । प्रतिनिधी**

देशभरात भारतीय जनता पार्टीचे संघटन पर्व अंतर्गत भाजपा सदस्यता अभियान-२०२४ सुरु आहे. शनिवारी गेवराई विधासभेतील तलवाडा याठिकाणी राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री, लोकनेत्या ना.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली, सदस्यता नोंदणी अभियान कार्यक्रम राबवून मोठ्या संख्येने सदस्यता नोंदणी करण्यात आली. यावेळी विधानसभा समन्वयक श्रीकांत सानप यांनी बोलताना सांगितले की, नामदार पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात गेवराई तालुक्यात विकास गंगा वाहणार आहे. तरी नागरिकांनी भाजपा सदस्य नोंदणी अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन देखील सानप यांनी केले. विष्णू म रकड, मछिंद्र थोरात,दत्ता शिंगणे, अन्य प्रमुख कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.



**देशात आणि राज्यात प्रत्येक तीन वर्षाला भाजपा सदस्य नोंदणी करते. व नवीन संघटनात्मक नेमणुका होतात. या सदस्यता नोंदणी अभियानात गेवराई तालुक्यात मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. यापूर्वी जिप गट मादळमोही, चकलांबा, जातेगाव, कोळगाव, पाचेगाव, गेवराई शहर या ठिकाणी भाजपा सदस्यता नोंदणी मोठ्या प्रमाणात केली आहे. ना.पंकजाताई मुंडे यांनी जात पात, धर्म, न पाहता सर्व समाजाला सोबत घेऊन, विकास कामे केली आहेत.सर्व वंचित घटकांना न्याय दिला आहे. या अभियानाद्वारे आपल्या नेत्या ना.पंकजाताई मुंडे यांचे हात बळकट करण्यासाठी गावोगाव अभियान राबवून मोठ्या प्रमाणात सदस्यता नोंदणी करणार असे, माजी जिल्हा परिषद सदस्य सुरेश हात्ते यांनी जाहीर केले आहे.**

# आरटीई प्रवेश फी प्रतिपूर्तीसाठी ४५ कोटींचा निधी

## आरटीई शुल्कसाठी ४५ कोटींचा निधी ; निकषानुसार निधी वाटप व्हावा – मनोज जाधव

**बीड । प्रतिनिधी**

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यांतर्गतच्या (आरटीई) २५ टक्के राखीव जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. शासनाकडून आरटीई प्रवेश फी प्रतिपूर्तीसाठी होत असलेला विलंब आणि या विलंबामुळे शाळांचा आरटीई प्रवेशाबाबत निरुत्साह पहावयास मिळत होता मात्र या २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया राबविलेल्या खासगी विनाअनुदानित शाळांना शुल्क प्रतिपूर्ती देण्यासाठी ४५ कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडून मान्यता मिळाली आहे.आरटीईअंतर्गत वंचित व दुर्बल घटकांतील मुलांसाठी मोफत प्रवेश व







शिक्षण देण्यात येते. प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती राज्य शासनामार्फत करण्याबाबतची तरतूद केली आहे. प्राथमिक शिक्षण संचालक यांनी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती शासनास केली होती. २०२४-२५ या आर्थिक वर्षात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रतिपूर्तीसाठी १७३ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित केला आहे. त्यातील ६९ कोटी २० लाख रुपयांचा निधी ५ सप्टेंबर २०२४ रोजी वितरित केला असून, आता ४५ कोटी निधी मंजूर केला आहे. सन २०२२-२३ आणि सन २०२३-२४ या वर्षांच्या प्रतिपूर्तीसाठी प्राधान्याने निधी वितरित होणार आहे.

### निकषानुसार निधी वाटप व्हावा – मनोज जाधव

**आरटीई प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्तीसाठी शासनाने निधी मंजूर केला आहे. हा निधी शासन निकषाप्रमाणे वाटप होणे गरजेचे आहे. मात्र यात काही संस्था चालक अधिकाऱ्यांवर दबाव आणून नियमबाह्य निधी लाटण्याच्या तयारीत आहेत. यामुळे विशेषत: छोट्या संस्था आणि ग्रामीण भागातील संस्था यांच्यावर अन्याय होत आहे. तेव्हा शासनाने घालून दिलेल्या अटी व नियमानुसारच हा निधी वाटप करावा अशी मागणी शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली आहे.**

### खालील निकषाला अनुसरून होणार निधी वाटप

**शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करताना विविध बाबींची पडताळणी करण्यात येणार आहे. इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी आकारण्यात येणाऱ्या शैक्षणिक शुल्काचा तपशील सरल अथवा आरटीई पोर्टलवर जाहीर करणे आवश्यक आहे. शाळांनी शुल्काचा तपशील संकेतस्थळावर नोंद करणे बंधनकारक आहे. शाळेने आरटीईची मान्यताप्राप्त असल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक असून, ऑनलाइन लॉटरी पद्धतीने शाळेत प्रवेश मिळालेला विद्यार्थी संबंधित शाळेतच शिकत असल्याची खात्री सरल व आरटीई पोर्टलवरून करावी. सर्व विद्यार्थ्यांचे आधारकार्ड सरल पोर्टलवर नोंदविलेले असावे, केवळ आधार नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या ग्राह्य धरून प्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या संख्येपैकी फक्त २५ टक्के संख्या ही प्रतिपूर्तीसाठी ग्राह्य धरण्यात येणार असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.**

